# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.नि.वि.वि./३१५/६/२०१४
मुंबई विद्यापीठ,
१ जूलै २०१४,

परिपत्रक : —

विषय : — विद्यापीठातर्फे आदर्श शिक्षक/शिक्षिका पुरस्कार सन २०१३—१४ विद्यापीठ/महाविद्यालयीन शिक्षकांची शिफारस करणेबाबत.

महोदय/महोदया,

आपणांस विदित आहे की, विद्यापीठ/महाविद्यालयीन स्तरावर आदर्श शिक्षक/शिक्षिकांचा शोध घेऊन विद्यापीठातर्फे विद्यापीठाने निर्धारित केलेल्या निकषाच्या आधारावर **विद्यापीठ विभागातील १ शिक्षक, महाविद्यालयातील २ शिक्षक (यापैकी १ शहरी व १ ग्रामीण महाविद्यालयातील शिक्षक)** अशा आदर्श शिक्षकांना शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. तसेच विद्यापीठातर्फे निवड होणा—या पुरस्कार प्राप्त शिक्षकांना प्रत्येकी रू. ५,०००/— रोख व त्यासोबत प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात येईल.(निकषाची प्रत सोबत जोडत आहे.)

या परिपत्रकाद्वारे असे कळविण्यात येत आहे की, विद्यापीठ विभागातील/महाविद्यालयातील विविध शाखांअर्तगत कार्यरत असलेले संचालक, विभाग प्रमुख, प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याता व इतर शिक्षकवर्ग यापैकी किमान १५ वर्षे सेवा झालेल्या चारित्र्यसंपन्न, विशेष प्राविण्यासह अर्हता व अनुभव असलेले व जे राज्य/आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मानित केले गेलेले अशा प्रशंसनीय निवडक व पात्र शिक्षकांची एक किंवा दोन नावे सोबत जोडलेल्या विवरण पत्राच्या मराठी व इंग्रजी अशा प्रतीमध्ये भरून **सहायक कुलसचिव, विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग, मुंबई विद्यापीठ, कक्ष क्रमांक १३२, पहिला मजला, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.** यांचेकडे दिनांक **३१ जुलै, २०१४** पर्यंत प्रस्ताव **प्रत्येकी चार प्रतीत पाठवून देण्याची व्यवस्था करावी.** (संबधित शिक्षकांची १० ते १५ ओळीत संक्षिप्त माहिती/ त्यांचा दूरध्वनी क्रमांक/महाविद्यालयाचा दूरध्वनी क्र. व घरचा पूर्ण पत्ता, तसेच संबधित शिक्षकांचे विद्यापीठ मान्यता पत्राची प्रत (**Teachers approval**) सोबत जोडणे आवसश्यक आहे. **(दिनांक ३१ जुलै २०१४** नंतरचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत तसेच अपु—या माहितीसह पाठविलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत याची, नोंद असावी.)

तसेच महाविद्यालयीन प्राचार्य यांचा प्रस्ताव संस्थाचालक यांचे मार्फत तसेच मुंबई विद्यापीठ विभागप्रमुख यांचा प्रस्ताव कुलसचिव, मुंबई विद्यापीठ यांचे शिफारशीसह पाठविणे क्रमप्राप्त आहे.

कृपया हे परिपत्रक आपण सर्व संबधित शिक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावे. तसेच विद्यापीठातर्फे आदर्श शिक्षक/शिक्षिकेंचा सन २००६—०७, २००७—०८, व २००८—०९ २००९—१०, २०१०—११, २०११—१२, २०१२—२०१३ पर्यंत पुरस्कार देऊन गौरव करण्यात आलेला आहे, अशा शिक्षक/शिक्षिकेचा प्रस्ताव पाठवू नये.

आपला विश्वासू,

प्राचार्य. (डॉ.) राजपाल एस. हांडे
(संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ)
मुंबई विद्यापीठ

मुंबई — ४०० ०३२
१ जूलै २०१४

.........................

प्रती,

१) प्राचार्य, सर्व संलग्नित अनुदानीत व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र महाविद्यालयें.

२) विद्यापीठाचे विविध विभागाचे संचालक व विभागप्रमुख

..२/—

**University of Mumbai**
***Fort, Mumbai – 400 032***
***BEST TEACHER AWARD FOR THE UNIVERSITY AND COLLEGE TEACHERS***

| Sr No. | Name of Teachers and Designation | Name of Department / College | Total Period of Service | Subject taught | Educational Qualification | Published Books/ Articles & Research | Administrative Experience | Co-curricular Activities | Participation in Social Activities | Received Prize / Award | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

***Place : -*** ***Signature of Director/Head of the University Department/Principal of*** ***College Teacher Signature***

***Date : -*** ***With Seal/Rubber Stamp.***

विवरण पत्र

## मुंबई विद्यापीठ
### फोर्ट, मुंबई, ४०० ०३२
### विद्यापीठ/महाविद्यालयीन स्तरावरील प्रशंसनीय शिक्षकांना पुरस्कार

| अनु. क. | शिक्षकांचे नाव व पदनाम | सध्या नोकरीत असलेले ठिकाण | नोकरीचा कालावधी | विषय | शैक्षणिक पात्रता | ग्रंथ/लेखन इ. संशोधन कार्य | व्यवस्थापनातील अनुभव | सहशैक्षणिक उपक्रमातील सहभाग | सामाजिक उपक्रमातील सहभाग | मिळालेली पारितोषिके, बक्षिसे/पुरस्कार | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

विद्यापीठाच्या विविध विभागाचे संचालक/विभाग प्रमुख/महाविद्यालयाचे प्राचार्य यांची स्वाक्षरी व मोहोर

शिक्षकांची स्वाक्षरी

दिनांक :—

ठिकाण :—